खंडाळा विभाग शिक्षण समिती संचालित

## राजेंद्र महाविदयालय, खंडाळा



## भूगोल विभाग

# "केसुर्डी गावातील लोकसंख्येचा अभ्यास"

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्याचे नाव : सूरज मधुकर रणवरे

बी.ए. भाग 3

रोल नं : ०२ परिक्षा नं :

## मार्गदर्शक

## प्रा. पडळकर एस. व्ही

## प्रा. मोघे ए. पी

प्रकल्पाचे वर्ष : 2018 ते 2019

...vidyalaya, Kh...
Tal. Khandala
Dist. Satara

# अनुक्रमणिका


| अ.न . | शीर्षक | पान नं . |
|---|---|---|
| 1 | प्रमाणपत्र | |
| 2 | ऋणनिर्देश | |
| 3 | सर्वेक्षणाची भौगोलिक पार्श्वभूमी | |
| 4 | अभ्यास क्षेत्र | |
| 5 | लोकसंख्या | |
| 6 | सुविधा | |
| 7 | समस्या | |
| 8 | निष्कर्ष | |
| 9 | प्रश्नावली | |
| 10 | संदर्भ सूची | |


Examined
16/3/19

Khandala Vibhag Shikshan Samiti,s

# Rajendra Mahavidyalaya Khandala



Department Of Geography

# CERTIFICATE

**Exam Seat No :**

This Is To Certofy That Miss/Mr. SURAJ MADHUKAR RANAWARE B.A. III class has satisfactory complited **Journal/Servey Report/Tour Report** as per academic year of 2018-19 as this report represent his/her bonafide work

**Place : Khandala**

**Date :**

**Sub Incharge** **Examiner** **Head Of Department**

Rajendra Mahavidyalaya, Khandala * Tal. Khandala Dist. Satara

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग–3 भूगोल (स्पेशल) या विषयाच्या सन 2018–2019 या शैक्षणिक वर्षापासून बदललेल्या नवीन सुधारित अभ्यासक्रमानुसार खंडाळा विभाग शिक्षण समिती संचालित, राजेंद्र महाविदयालय खंडाळा ता. खंडाळा. जि. सातारा तेथील भूगोल विभागाने आयोजित केलेल्या केसुर्डी ता. खंडाळा येथील ग्रामसर्वेक्षणाचा अहवाल सादर करताना मला फार आनंद होत आहे.

आज जगातील विविध प्रदेशात अनेक प्रकारच्या समस्या तेथील वास्तव करणाऱ्या लोकांना भेडसावतात. उदा. : नैसर्गिक आपत्तीच्या समस्या, प्रदूषण, नागरी समस्या लोकसंख्या वाढ इ. महाराष्ट्रात लोकसंख्या वाढीबरोबरच अनेक समस्यांना लोकांना तोंड दयावे लागत आहे. केसुर्डी येथील लोकांच्या समस्या तसेच अडचणी जाणून घेण्यासाठी आम्ही केसुर्डी ता. खंडाळा जि. सातारा येथील ग्रामसर्वेक्षण यशस्वी केले. या सर्वक्षणसाठी आम्हाला प्राचार्या. डॉ. पाटणे यांची प्रेरणा मिळाली त्यामुळे मी त्यांचाही आभारी आहे.

भूगोल विभाग प्रा. पडळकर सुजाता व प्रा मोधे अंकुश यांचे ग्रामसर्वेक्षणात व अहवाल लिखाण कार्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. याबददल मी त्यांचे आभार व्यक्त करते. तसेच प्रा. डॉ. शेख एस. एच यांचे सुध्दा वेळोवेळी सर्वेक्षणासाठी सहकार्य मिळाले. त्याबदल त्याचे ही मी आभारी आहे.

लोकसंख्या सर्वेक्षण अहवाल लिहिताना आमचे गट प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले तसेच सर्वेक्षणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहाय्य केल्याबददल केसुर्डी येथील ग्रामसेवक व ग्रामस्थ यांचेही मनःपूर्वक आभार.

## प्रकरण 1 ले

## सर्वेक्षणाची भौगोलिक पार्श्वभूमी

**ग्राम सर्वेक्षणाचे महत्व :**

भूगोल विषयात क्षेत्र अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे. गावच्या विकासावर परिणाम करणाऱ्या नैसर्गिक घटकांचा अभ्यास आर्थिक समस्या. सामाजिक समस्या यांचा अभ्यास फक्त पुस्तकातच होत असतो. विविध प्रदेशांचा अभ्यास केल्यास तेथील मानवीजीवन व भौतिक पर्यावरणाचा सहसंबध अनुकुल तर काही ठिकाणी प्रतिकूल असतो. तरी सुद्धा मानव त्या परिस्थितीशी मिळते जुळते घेतो. आपला जीवनक्रम समजण्यासाठी भूगोलाच्या अभ्यासात सर्वेक्षण आभ्यसाला फारच महत्व आहे. सर्वेक्षण अभ्यासात भुपृष्ठावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या निरीक्षणाचा अभ्यास होतो. त्यामुळे भूगोलाच्या विदयार्थ्यांना भौगोलिक परिस्थीती व मानवी जीवन यांचा संबंध स्पष्ट करणे आवश्यक आहे. सर्वेक्षण संबंधीत खेडयात गेल्याशिवाय त्याला सर्वेक्षणाचा सहसंबंध स्पष्ट करता येत नाही. त्यामुळे सर्वेक्षणाला खेडयात जाऊन विविध माहिती मिळवण्यासाठी सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

खंडाळा तालुक्यातील केसुर्डी या ठिकाणी ग्रामसर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाचा अभ्यास करताना आर्थिक सामाजिक शैक्षणिक लोकसंख्या गावपातळीवरील समस्या,जन्मदर व मुत्युदर व त्यामध्ये आढणाऱ्या अभीक्षेत्रीय भिन्नता यामध्ये असणाऱ्या कार्यकारण सहसबंधं शोधुन काढण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामसर्वेक्षणात राजकीय परिस्थीतीचाही अभ्यास अंतभूत करण्यात येतो. म्हणूनच भूगोलाच्या अभ्यासात ग्रामसर्वेक्षणात अनन्य साधारण महत्व आहे.

# स्थान

## सर्वेक्षण गाव, व केसुर्डीचे स्थान :

आम्ही सर्वेक्षणास निवडलेल्या गावचे स्थान हक सातारा जिल्ह्यातीलखंडाळा तालुक्यात बसलेले आहे. केसुर्डी हे गाव पश्चिम महाराष्ट्रात वसलेले आहे. हे पुणे विभागात आहे. केसुर्डी हे गाव खंडाळा या तालुक्या पासून 6 कि.मी आहे. केसुर्डी हे ठिकाण राष्ट्रीय महामार्ग 4 (पुणे –बेंगलोर) ला लागून आहे. कवठे 3 कि.मी. पूर्वेला बावडा 6कि.मी उत्तरेला भादगाव दक्षिणेला अजुनुज 4कि.मी ही गावे वसलेली आहेत. वाई, सासवड, महाबळेश्वर, सातारा, हे शहर केसुर्डी जवळील आहेत.

प्रकरण दुसरे :

सहयाद्री डोंगर रांबाचा वारसा लाभलेला आणि कायम दुष्काळी असणाऱ्या खंडाळा तालुक्यातील खंडाळा पासुन 6 कि.मी अंतरावर केसुर्डी हे गाव आहे. गावाची लोकसंख्या सन 2011 मध्ये 1220 इतकी असून पुरुषांची संख्या 639 व स्त्रिया 47.6 टक्के 581 घरांचह संख्या 259 आहे.

केसुर्डी गावाचे एकूण क्षेत्रफळ 1248.39 हेक्टर इतकी आहे एकुण क्षेत्रफळापैकी भुखंडाखाली 25672 चौ.मी खुली जागाचे क्षेत्रफळ 4811 चौ.मी सार्वजनिक उपयोग क्षेत्र 5 चौ.मी व त्याच प्रमाणे समाजमंदीर प्राथमिक शाळा चावडी, बालवाडी व बसस्थांबासाठी उर्वरित क्षेत्र आहेत केसुर्डी मध्ये सर्वेक्षण करताना खालील गोष्टी साध्या करण्यात आलेलेल्या आहेत.

1. निर्सगाचा समतोल साधणे.
2. आपापसात सुसंवाद साधणे.
3. गुटखा गंदी दारु, बंदी इ. गावातील वेसनातील खर्च.
4. कुटुंब नियोजनात सहभाग.
5. पाणी व्यवस्थापण शुद्ध पाणी पुरवठा सांडपाण्याचा परस बागेसाठी वापर.
6. घर तिथे शौचालय सार्वजनिक वापर.
7. शेती समस्यावरील उपाय.
8. सांस्कृतीक कार्यक्रमात सहभाग.
9. निमल ग्राम व व्यसनमुक्त गाव.
10. गावाच्या यात्रेवेळी सामाजिक एकोपा निर्माण करणे.

### ग्रामसर्वेक्षणाची उदिद्ष्टे :

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची महत्वाची उपशाखा आहे. लोकसंख्या भूगोलाची गतिमान स्वरुप आणि काळाची गरज लक्षात घेऊन बी.ए. भाग 3 पेपर नंबर 14 मध्ये ग्राम सर्वेक्षण अभ्यसक्रमात घेण्यात आले गावपातळीवरील अनेक समस्यांचा आभ्यास सर्वेक्षणात करण्यात आला त्यानुसार खालील उद्दिष्टयांना अनुसरुन केसुर्डी गावाचे सर्वेक्षण करण्यात आले.

1. गावातील कुटूबें व कुटूबातील एकूण सदस्य संख्या अभ्यासणे.
2. केसुर्डी गावातील शैक्षणिक सोयीचा अभ्यास करणे.
3. कुटूबांतील सुखसोयीचा अभ्यास करणे.
4. गावातील साक्षरतीची पातळी आभ्यासणे.
5. येथील ग्रामसमस्या भविष्यकालीन योजना आभ्यासणे गावातील लोकांच्या शेतीविषयक अभ्यास करणे.
6. व्यवसाय संरचना अभ्यासणे.
7. कुटुबांचे वार्षीक उत्पन्न अभ्यासणे.
8. गावातील लिंग गुणोत्तर अभ्यासणे .
9. लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास करणे.
10. गावातील सामाजिक आर्थिक करणे.
11. समस्या वरील उपाय योजना सुचविणे पाणी पुरवठयांचा अभ्यास करणे.

ग्रामसर्वेक्षणाच्या अभ्यास पद्धती :

केसुर्डी गावाच्या सर्वेक्षण उदिद्ष्टांची पुर्ता करण्यासाठी माहिती गोळा करताना पुढिल अभ्यास पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

अ) प्राथमिक माहिती :

सर्वेक्षणात माहिती गोळा करण्यासाठी भूगोल विभागाने तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे प्रत्येक कुटूबांच्या घरी जाऊन मुलाखती घेण्यात आल्या त्या द्वारे वरील उदिद्ष्टांना अनुसरुन माहितीचे संकलन करण्यात आले.

ब) दवितीय माहिती :

केसुर्डी गावातील केलेले सर्वेक्षण केसुर्डी ग्राम विकास कमिटीचे कार्यालयातुन व सदस्युमार्फत आवश्यक असणारी व्दितीय स्वरूपाची माहिती सांख्यिकीय स्वरुपात मिळविण्यात आली.

## प्राकृतिक रचना – केसुर्डी

### 1) हवामान :

हवामान केसुर्डी हे गाव मोसमी हवामान प्रदेशात असुन मोसमी पाऊस अनिश्चित स्वरुपाचा असतो. खंडाळा हा कायम दुष्काळी असल्याने साहजिकच केसुर्डी गावाम पर्जन्याचे प्रमसण अत्यल्प असुन ते सरासरी 400 ते 500मी इतके आहे. तसेच तापमान अधिक असल्याने कडक उन्हाळे जाणवतात ते महिन्यातील येथील सर्वधिक तापमान 40 अंश से. अतके असते या गावात हवामानाचा एकंदरीत परिणाम शेती व्यवसायवर झालेल्या दिसुन येतो म्हणुन कमी पावसावर येणारी पिके या ठिकाणी घेतली जातात.

### 2) मृदा– जमिन :

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीच्या दृष्टीने जमिनीला फार महत्व आहे. आम्ही भेट दिलेले केसुर्डी हे गाव डोंगराच्या पायथ्यालगत खडकाळ भागावर वसलेले असल्याने जमिनीचे स्वरुप काही भागात खडकाळ असुन ती मृदा मुरमाड गटात मोडते अभ्यास क्षेत्रातील मृदा मध्यम जाडीची असुन तीची सर्वसाधारण जाडी 55 से.मी व 1 मी पर्यत आढळून येते या गावामध्ये पाणी पुरवठयाच्या सुविधा नसल्यामुळे पारंपारिक पीक मोठया प्रमाणात घेतली जातात.

### 3) पाणीपुरवठा :

पाणी हे मानवाच्या प्रमुख गरजापैंकी एक महत्वाची गरज महत्वाची गरज असुन पाण्याचा उपयोग पिण्याकरिता शेतीसाठी उदयोगधंदयासाठी केला जातो. केसुर्डी ग्राम विकास कमिटी तर्फे बोरवेल वर हापसे बसवून केलेली आहे. त्याच प्रमाणे सार्वजनिक नळ योजना त्या ठिकाणी अर्तगत केलेली आहे. हात पंपाच्या

लोकापर्यंत पोहचवले जावून पाणीपुरवठयांची सोय उत्तम प्रकारे केलेली आहे.

**लिंग– गुणोत्तर :**

एका विशिष्ट वेळी स्त्री– पुरुषांचे सामाजिक स्थान लक्षात येण्यासाठी तसेचा स्त्री पुरुष समानतेची कल्पना येण्यासाठी गुणोत्तर प्रमाण उपयोगी ठरते. म्हणूनच आम्ही केसुर्डी ग्राम सर्वेक्षण अभ्यासात लिंग – गुणोत्तर प्रमाणचा समावेश केला.

दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जातो.

सूत्र :

केसुर्डी मधील एकुण स्त्रीया

लिंग – गुणोत्तर = ............................................................ 1000

केसुर्डी मधील एकूण पुरुष

581

लिंग – गुणोत्तर = .............................. 1000

639

दर हजारी पुरुषांमागे 909.23 स्त्रीया आहेत.

प्रकरण तिसरे :

## लोकसंख्या अभ्यास केसुर्डी :

केसुर्डी हे सातारा जिल्हयातील गाव असुन ते खंडाळा तालुक्यात वसलेले आहे. या गावात एकूण कुटुंबे 259 असून गावाचह सन 20011 मधील लोकसेख्या 1220 इतकी आहे. त्यातील 639 पुरुष व 581 स्त्रिया आहेत या गावातील जास्तीत जास्त लोक हिंदू मराठा, धनगर या समाजातील आहे हे या गावामध्ये बहुंताश लोक शेती व्यवसाय करतात तर काही लोक मजुरी नोकरी करतात गावामध्ये जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. गटारे दळणवळण पिण्यांचा पाण्यासाठी प्रादेशिक नळपाणी पुरवठा उपलब्ध आहे. या गावचा आर्थिक व्यवहार शिरवळ व खंडाळा या शहरोवर अवलंबुन आहे.

## धर्म जात व भाषाः

केसुर्डी गावातील शैक्षणिक आठवा घेण्याच्या उदेद्शाने केलेल्या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहीतीवरुन जास्तीत जास्त लोक मराठा व धनगर समाजातील आहेत. या गावात सर्व लोक मराठी भाषा बोलतात. या गावची लोकसंख्या 1220 आहे.


## लोकसंख्या वाढ

भारताच्या सन 2011 मधील जनगननेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटीपेक्षा अर्थिक होती. महाराष्ट्राची 11.23.72.972 लोकसंख्या होती. लोकसंख्येच्या दुष्टीने महाराष्ट्राचा भारतात दुसरा क्रंमाक लागतो. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दरावर नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम होतो. उदा. हवामान दरडोई उत्पन्न औदयोगिकीकरणरु नागरीकरण इत्यादी.

सन 2011 च्या जनगणनेनुसार केसुर्डी गावाची लोकसंख्या 1220 इतकी असुन पुरुषांची स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.

### केसुर्डी लोकसंख्या तक्ता

| अ.न | वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2011 | 639 | 581 | 1220 |



**वय संरचना :**

केसुर्डी गावातील लोकसंख्यची विभागणी केल्यानंतर एकूण लोकसंख्येत काम करणाऱ्याचे प्रमाण किती आहे. हे समजू शकते गावातील 15 ते 59 वयोगटातील स्त्री पुरुष कामधंदा करु शकतात. म्हणजे 0 ते 14 वयोगटातील मुले मुली आणि 60 वर्षापेक्षा जास्त वयोगटादरम्यान असणाऱ्या लोकसंख्येत प्रमाण अधीक असेल तर परावलेबीत अनुउत्पादक प्रमाण कमी असते. या गावात जन्मदर मृत्युदर कमी झाला आहे. वयोरचनेचा अभ्यास करण्यासाठी वयोगटाची विभागणी 5 गटात करण्यात आली.

**लिंग व वय संरचना :**


तक्ता क्र :

| अ. न | वय | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 0 ते 5 | 38 | 30 | 68 |
| 2 | 6 ते 14 | 95 | 90 | 185 |
| 3 | 15 ते 34 | 156 | | |
| 4 | 35 ते 59 | 250 | 245 | 495 |
| 5 | 60 पेक्षा जास्त | 100 | 68 | 168 |
| | एकूण | 639 | 581 | 1220 |

## केसुर्डी गावातील लिंग – गुणोत्तर तक्ता.

| अ.न | वय | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 0 ते 5 | 38 | 30 | 68 |
| 2 | 6 ते 14 | 95 | 90 | 185 |
| 3 | 15 ते 34 | 156 | 148 | 304 |
| 4 | 35 ते 59 | 250 | 245 | 495 |
| 5 | 60पेक्षा जास्त | 100 | 68 | 168 |
| | एकूण | 639 | 581 | 1220 |


:



व्यवसाय संरचना :

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकासाची अवस्था ही म्या देशातील काम करणाऱ्या लोकसंख्येची विविध व्यवसायात कशा पध्दतीने विभागणी झालेली आहे याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. केसुर्डी व्यवसाय संरचनेचे पुढील पाच गटात वर्गीकरण केले आहे. 15 वर्षाखालील बालकांचा आणि 60 वर्षाखालील वृध्दांचा कार्यकारी लोकसंख्येत सामावेश करण्यात आला नाही.

| अ.न | प्राथमिक | व्यवसाय | व्दितीय व्यवसाय | तृतीय व्यवसाय | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | शेती | मजुरी | नोकरी | व्यवसाय | उदयोगधंदे |
| पुरुष | 356 | 154 | 220 | 40 | 30 |
| टक्केवारी | 44.5टक्के | 19.25टक्के | 27.5 टक्के | 5 टक्के | 3.75टक्के |




वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, 44.5टक्के लोक हे प्राथमिक व्यवसायावरच अवलंबून आहे. टक्के लोक हे नोकरीवर अवलबूंन आहेत. तर 5 टक्के लोक हे व्यवसाय व उदयोधंदे करतात असे दिसून आले.

## आर्थिक संरचना

आम्ही भेट दिलेल्या केसुर्डी या गावच्या लोकसंख्येचा संरचेचा अभ्यास करताना आर्थिक संरचना घटकाचा अभ्यास करावा लागतो. आर्थिक संरचनेच्या अभ्यासातून उत्पन्नाची पातळी व दर्जा समझतो. आर्थिक संरचनेत तक्ता पुढीलप्रमाणे

## आर्थिक संरचना तक्ता नं. 2. 10

| अ. न | वर्षिक उत्पन्न | कुटुंबाचीसंख्या |
|---|---|---|
| 1 | 5000 पेक्षा जास्त | 8 |
| 2 | 5000 ते 10000 रुपये | 30 |
| 3 | 10000 ते 20000 रुपये | 45 |
| 4 | 20000 ते 30000 रुपये | 56 |
| 5 | 30000 ते 40000 | 52 |
| 6 | 40000 ते 50000 रुपये | 28 |
| 7 | 50000 रूपयापेक्षा जास्त | 40 |
| | एकूण | 259 |





साधा स्तंभालेख (वार्षिक उत्पन्न गटानुसार)

**शैक्षणिक आढावा – अभ्यास**

पूर्वीच्या काळी शिक्षण हे उच्चवर्णीयांनीच घ्यायचे अशीच पध्दत होती. कालांतराने त्यात बदल होऊन शिक्षण हे सर्व तळागाळातील लोकांसाठी असावे असा ठराव महात्मा फुले यांनी हंटर आयोगापुढे माडंला. त्यानुसार प्राथमिक शिक्षण सर्व मुलांसाठी खुले झाले पण स्त्रियांना मात्र शिक्षणाची दारे बंद होती. चूल व मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मानले होते. याच पारंपारिक विचाराच्या समाजात जुन्या व भुरसटलेल्या विचारांचे जोखड जर फेकुन दयायचे असेल म्हणजेच समाज सुधारायचा असेल तर प्रथम स्त्री शिकली पाहिजे. हे महात्मा फुले यांनी ओळखले व त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवले. केसुर्डी हे गाव शैक्षिणकदृष्टया सुधारलेले असून गावात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी आहे. केसुर्डी गावात जि. प. शाळा केसुर्डी आहे. सर्वेक्षणातून या गावातील मुलांचा शैक्षणिक स्तर पुढीलप्रमाणे स्पष्ट होतो.

| शैक्षिणक स्तर | मुले/पुरुष | मुली/ स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| 1 ली ते 7 वी | 95 | 90 | 125 |



## प्रकरण चौथे

## केसुर्डी गावातील शैक्षणिक स्तर.

### 1) प्राथमिक शाळा :

केसुर्डी येथील मुलांसाठी 1ली ते 8 वी पर्यत जिल्हा परिषद शाळा आहे.

### 2) अंगणवाडी संस्था :

केसुर्डी येथे अंगणवाडी संस्था असून यामध्ये 3 ते 5 वयोगटातील मुले –मुली जतात.

### .3) पाणीपुरवठयाच्या सोयी :

केसुर्डी येथे पाणीपुरवठयाच्या सोयी चांगल्याप्रकारे आहेत.गावात नळपाणीपुरवठा योजना आहेत. नळाव्दारे पाणी पुरवले जाते तसेच गावात 02 हातपंप आहेत. अशाप्रकारे पाण्याची उपलब्धता आहे.

### 4) समाज मंदिर :

केसुर्डी या गावातील लोकांसाठी समाज मंदिर बांधण्यात आले आहे. तसेच जानुबाई मंदिर महादेव मंदिर, मारुतीचे मंदिर व लक्ष्मी देवीचे मंदिर आहे.

### 5) रस्त्यावरील दिवाबत्ती :

केसुर्डीमध्ये रस्त्यावर ठिकठिकाणी दिवाबत्तीची सोय केलेली आहे.

## शैक्षणिक समस्या

**1) मुलांची गैरहजरी :**

केसुर्डी मध्ये प्राथमिक व शाळा असूनही मुले शाळेत जात नाहीत कारण सर्वेक्षण करताना जाणवलेकली परिस्थिती घरातील काम यामुळे काही मुलांना शाळेत जाता येता नाही.

**2) आर्थिक परिस्थिती :**

केसुर्डी मधील काही ठिकणी गरिब परिस्थितीमुळे शाळैत जाता येत नाही.

**3) स्थगिती :**

केसुर्डी मधील सर्वेक्षणात असे दिसुन आले की बरेच कुटुबात 150 पर्यतच शिक्षण घेतले असून त्या नतंर शिक्षणास स्थगिती आली आहे.

**4) पालकाचे अज्ञान :**

केसुर्डी मध्ये सर्वेक्षणात असे दिसून आले की पालक हे अज्ञानी असुन आपल्या पाल्याबददल जागृक नाही.

**5) निरक्षता :**

केसुर्डीत काही लाक अडाणी असल्याने आपल्या पाल्याबाबत जागृक असलेले दिसून येत नाही.

## प्रकरण पाचवे

## समस्या व उपाय

### 1) शाळेतबाबत आकर्षकता :

मुलांनी शाळेत यावे त्यांना शाळेविषयी गोडी वाटावी यासाठी शाळेत वेगवेगळे उपक्रम रबवणे गरजेचे आहे. ज्याच्या व्दावारे मुलांची उपस्थिती टिकून राहिल.

### 2) आर्थिक मदत :

आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना शाळेत येण्यास जमत नसेल तर शासनाकडून त्या मुलांसाठी काही योजना आखून त्यांचा सर्व खर्च करणे गरजेचे आहे.

### 3) दहावी नंतर शिक्षणाचे मार्गदर्शन केंद्र :

बहुतेक मुलांची 10 वी झाल्यानंतर पुढे काय करायचे हा प्रश्न भेडसावतो. बहुतेक मुले शाळा सोडून शेती, मजुरी यासारखे पर्याय निवडतात. अशा मुलांसाठी 10 वी नतंर करिअर गाईडन्स मिळावा यासाठी मार्गदर्शन केद्र गावातच उपलब्ध असावे.

### 4) शिक्षणाविषयी जनजागृती :

केसुर्डी या गावातील लोक जास्तीत जास्त 12 वी पर्यतच शिकलेने असून. या गावात सरकारी नोकरी करणारे लोक अत्यंत कमी प्रमाणात दिसून आले. यासाठी शिक्षणाविषयी जनजागृती करणे गरजेचे वाटते.

5) पालकांचे प्रबोधन :

पलक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत दक्ष रहावेत यासाठी पालकांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. पालकांचे अज्ञान दूर होण्यासाठी प्रयत्न केल्याने समाज अजून सुधारित होईल.

6) गावात वाचनालय सुरु करणे :

गावातील लाकांना, मुलांना वाचनाची गोडी वाटावी म्हणून गावात वाचनालय सुरु करावे. गावातील मुलांना चालू घडामोडी समजाव्यात यासाठी वाचनालय असावे. गावातील शैक्षणिक समस्या विचारात घेऊन वरीलप्रमाणे त्यावर उपाययोजना सुचवल्या आहेत.

- गावातील साक्षरता :

कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकासंख्येचे शिक्षण हा महत्वाचा घटक समजला जातो. स्वतःच्या भाषेत लिहता – वाचता येणे म्हणजेच साक्षर होय. ज्याला कोणत्याही भाषेत पूर्ण क्षमतेने लिहता – वाचता येत नाही. त्यास निरक्षर म्हणले जाते. शिक्षण ही सामाजिक बाब समजली जाते. अर्थपूर्ण शिक्षणामुळे व्यतींना वैज्ञानिक दुष्टी प्राप्त होते. लोकसंख्येची वाढ रोखण्याची जाणिव होते व त्यामधुन कुटुंब नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करता येते. लोकसंख्येची सामाजिक व आर्थिक गतिमानता ही तेथील साक्षरतेवर व शैक्षणिक पातळीवर अवलंबून असते. तसेच गावाचा विकास हा साक्षरतेवर अवलंबून असतो. म्हणूनच ग्रामसर्वेक्षणात साक्षरता हा घटक घेतला आहे.

साक्षरतेचे मापन करण्यासाठी साक्षरता प्रमाण विचारात घेतले जाते. साक्षरता प्रमाण पुढील सुत्राच्या सहाय्याने काढले जाते.

सुत्र :

$$\text{साक्षरता प्रमाण} = \frac{\text{एकुण साक्षर व्यक्तीची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times 100$$

## सर्वेक्षण केलेल्या केसुर्डी गावातील समस्या

**प्रस्तावना :**

सहयाद्रीच्या डोंगररांगाचा वारसा लाभलेल्या खंडाळा तालुक्यातील खंडाळयापासून 6 कि.मी अंतरावर अजनूज बाजूस केसुर्डी हे गाव आहे. हे गाव खंडाळा तालुक्यात बसलेले आहे.

### केसुर्डीला भेडसावणाऱ्या समस्या :

**1) शेतीच्या संदर्भात :**

केसुर्डी मधील बहुतांश लोक शेतीवरच आधारित – अवलंबून आहेत. या गावातील लोकांना 5 ते 6 कि2मी अंतरावर शेतजमीन करण्यासाठी मिळालेल्या आहेत. त्यामुळे रोज शेतावर जाण्यासाठी लागणारा वेळ व वाहन यांच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे शेतीवर पूर्ण लक्ष ठेवता येत नाही दृ परिणमी शेतीवर अनेक समस्या निर्माण होतात.

**2) नापीक जमीन :**

खंडाळा तालुका हा डोंगराळ व कायम दुष्काळी भाग असल्याने येथील जमीन नापीक व खंडाळा आहे. त्यामुळे कोणत्याही पिकांचे उत्पादन घेणे शक्य होत नाही. यामुळे येथील लोकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते.

**3) पक्क्या रस्त्यांची कमतरता :**

या गावातील बहुतांश रस्ते हे कच्च्या स्वरुपातील आहेत. या गावाची विशिष्ट ओळख नसली तरीही आजपर्यंत या लोकांना पक्कया रस्त्याची उपलब्धता झाली नाही.

**4) वाहतूकीच्या सोयीचा अभाव :**

या गावात पक्के रस्ते उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे वाहतूकीच्या सोयींची कमतरता होते. या गावात महाविदयालयीन शिक्षण नसल्यामुळे या गावातील मुलांना बाहेरगावी शिक्षणसाठी लावे जावे लागते.

**5) शैक्षणिक सुविधांचा अभाव :**

केसुर्डी गाव या गावात मुलांसाठी अंगणवाडी व प्राथमिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. परंतु माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवीपर्यंत शिक्षणासाठी मुलांना खंडाळा व शिरवळ येथे जावे लागते. त्यामुळे. बराचसा वेळ पायी चालण्यात व प्रवासात जातो.

**6) उदरनिर्वाह :**

या गावातील लोकांचा उदरनिर्वाह शेती या एकमेव व्यवसायावर अवलबूंन आहे. गावातील तरुण वर्ग मोठया प्रमाणावर शिक्षणासाठी शहरांकडे आकर्षित झालेला दिसून आला.

**7) शासकीय धोरणांचा अभाव :**

केसुर्डी या गावात शैक्षणिक सुविधा, रेशनिंग कार्ड एस.टी. बस थांबा, शौचालय, सुधारित चुली इ. दिसुन आल्या.

## केसुर्डी गावातील समस्येवर उपाय

केसुर्डी गावातील समस्येवर उपाय पुढील प्रमाणे

1. खडकाळ व नापीक जमीन मोठया प्रमाणात शेती लागवडीखाली आणणे.

2) शेतीमध्ये ठिबंक सिंचनाच्या वापर करुन पाण्याची समस्या दूर होईल.

3) गावात महिलासाठी बचतगट स्थापन करुन देणे.

4) शैक्षणिक सोयी सुविधांचा अधिकाअधिक विकास करणे.

5) गावात पौढ साक्षरता अभियान चालविणे.

6) गावात शेतीवजा लहान–लहान उदयोगधंदे उभारुन रोजगार निर्मीती करणे.

7) पाणीपुरवठयाच्या सोयी सुविधा आहेत परंतु शेतीसाठी मूबलक सोयी उपलब्ध करावयात

8) गावाला शासकीय योजनेची अंमलबजावणी वेळीच करावी.

9) गावात प्राथमिक आरोग्य केंद्र व पशु वैदयकीय दवाखाना उपलब्ध करु दयावे.

10) गावातील सांडपाणी झाडांना किंवा शेतीला वापरावे.

11) गावात तांत्रिक प संगणक शिक्षणाची सोय असावी.

12) गावातील लोकांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी वाचनालयाची सोय असावी .

13) गावात भांडण – तंटा होऊ नये यासाठी प्रयत्न करणे .

## निष्कर्ष

केसुर्डी गाव ता. खंडाळा . जि. सातारा गावचा ग्रामसर्वे केल्यानंतर त्यामध्ये विविध गोष्टीचा अभ्यास करुन त्यांचे विश्लेषण करण्यात आले. शैक्षणिक आढावा केल्यानंतर काही निष्कर्ष काढण्यात आले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

1. गावातील 50 टक्के समाजातील इतर समाजातील 10 टक्के आहेत. व 40 टक्के लोकसंख्या धनगर आहेत.
2. बहुसंख्य लोक मराठी भाषिक आहेत.
3. साक्षरतेच्या अभ्यासातून असे दिसून आले की, स्त्री साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.
4. गावातील लोकोख्येवरुन असे दिसून आले की, स्त्रीयांची लोकांख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे.
5. केसुर्डी गावात बहुसंख्य लोक शेती व मजुरी हेच प्राथमिक व्यवसाय करतात तर नोकरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी आहे.
6. गावातील सर्वाधिक कुटूबांचे उत्पन्न 20,000 ते 30,000 दरम्यान आहे. तर रुपये 50,000 पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटूबांची संख्या 23 आहे.
7. घरातल सुख सोयीचा साधने बहुांख्य कुटूबांत नाहीत.
8. शासनसच्या धोरणंची अंमलबजावणी सुरळीत पणे होते.
9. केसुर्डी या गावात चांगल्या प्रमाणात शैक्षणिक सोयी सुविधा असून त्याचा तेथील मुलांवर चांगला परिणाम होतो.
10. केसुर्डी गावामध्ये असे दिसून आले की, गावातील रस्ते. इतर सोयी चांगल्या प्रकारे आहेत

# संदर्भ


1) आपला सातारा जिल्हा – इंद्रजित नलपडे – डॉ. शहापूरक, डॉ.शेटे डॉ. फुले– अभिजीत प्रकाशन लातूर.

2) प्रात्यक्षिक भूगोल– डी. वाय, अहिरराव – सुदर्शन प्रकाशन नाशिक.

3) केसुर्डी प्रकल्प – अहवाल. (केसुर्डी विकास कमिटी )

4) Google .Com.

5) Encyclopedia of vahagav. Tal- khandala, Dist- satara .











